**पोलीस अधिक्षक कार्यालय, वाशिम**
काटा रोड, सिव्हील लाईन, वाशिम, ता.जि.वाशिम.
कार्यालय दूरध्वनी क्र. – ०७२५२-२३४८२४
ई-मेल :- sp.washim@mahapolice.gov.in
वेबसाईट :- www.washimpolice.gov.in

स्वातंत्र्याचा अमृत महोत्सव

---

**• प्रेस नोट •** दि.०१.०८.२०२२

# ‘काळाबाजार’ विरोधात वाशिम पोलिसांची धडक कारवाई ; वर्षभरात १२ कारवाया तर त्यापैकी एकाविरोधात MPDA.

***

दैनंदिन जीवनात आवश्यक असलेल्या जीवनावश्यक वस्तूंची काळाबाजारी, साठेबाजी करून कृत्रिम टंचाई निर्माण केली जाते. त्यामुळे महागाई वाढून त्याचा जनसामान्यांच्या जीवनावर विपरीत परिणाम होतो. अश्याप्रकारचा जीवनावश्यक वस्तूंचा गैरप्रकार तसेच काळाबाजार रोखण्यासाठी साठेबाजी/काळाबाजारी करणाऱ्यांविरोधात मा.पोलीस अधीक्षक श्री.बच्चन सिंह (IPS) यांच्या मार्गदर्शनाखाली वेळोवेळी जीवनावश्यक वस्तू कायदा १९५५ नुसार कारवाया करण्यात येत आहेत.

**मागील वर्षभरात वाशिम जिल्हा पोलीस दलाने जीवनावश्यक वस्तू कायदा १९५५ नुसार जीवनावश्यक वस्तूंची काळाबाजारी, साठेबाजी करणाऱ्यांविरोधात एकूण १२ कारवाया करण्यात आल्या असून १८ आरोपींच्या अटकेसह अंदाजे ६४ लाख ९५ हजार रुपयांचा मुद्देमाल जप्त करण्यात आला आहे. त्यापैकी एका साठेबाजी/काळाबाजारी करणाऱ्या आरोपीविरोधात MPDA अंतर्गत कारवाई करण्यात आली आहे.** त्यामध्ये पो.स्टे. मंगरूळपीर येथील ०५ गुन्हे, पो.स्टे.रिसोड येथील ०२ गुन्हे, पो.स्टे.कारंजा शहर येथील ०२ गुन्हे, पो.स्टे.कारंजा ग्रामीण, पो.स्टे.आसेगाव व पो.स्टे.अनसिंग येथील प्रत्येकी ०१ असे एकूण १२ गुन्हे दाखल केले आहे. सदर प्रकरणांमध्ये ०९ प्रकरणे हि तांदूळ या अत्यावश्यक धान्याची काळाबाजारी व ०३ प्रकरणे हि गहू व तांदूळ या धान्यांच्या काळाबाजारी प्रकरणी दाखल करण्यात आलेली आहे. दाखल केलेल्या १२ गुन्ह्यांपैकी ०२ प्रकरणांमध्ये वि.न्यायालयात चार्जशीट दाखल करण्यात आल्या असून उर्वरित प्रकरणांचा तपास लवकरात लवकर पूर्ण करून चार्जशीट दाखल करण्याबाबतच्या सूचना पोलीस अधीक्षक श्री.बच्चन सिंह (IPS) यांनी संबंधित तपासी अधिकाऱ्यांना दिल्या आहेत.

जीवनावश्यक वस्तूंचा गैरप्रकार करत साठेबाजी व काळाबाजार करून नागरिकांच्या सोयीसुविधांमध्ये बाधा निर्माण करू पाहणाऱ्या साठेबाजांवर वाशिम पोलीस दल लक्ष ठेवून आहे. नागरिकांनीही त्यांना आढळलेल्या जीवनावश्यक वस्तूंच्या गैरप्रकाराबाबत वाशिम जिल्हा पोलीस नियंत्रण कक्षास (संपर्क क्र. ०७२५२-२३४८२४) किंवा संबंधित पोलीस स्टेशनला माहिती द्यावी, असे आवाहन वाशिम जिल्हा पोलीस दलातर्फे करण्यात येत आहे.

**(जनसंपर्क अधिकारी)**
पोलीस अधिक्षक कार्यालय,
वाशिम यांचेकरिता.